# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांचा संयुक्त उपक्रम)**

नोंदणीकृत कार्यालय: एमएमआरसी ट्रांझिट कार्यालय बिल्डिंग, ए विंग, इ- ब्लॉक, सिटी पार्कच्या उत्तरेस,
आयकर कार्यालयाच्या मागे, वांद्रे–कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई – 400 051, महाराष्ट्र

## सार्वजनिक सूचनापत्र

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मेट्रो रेल्वे प्रशासन) 'मेट्रो लाइन–3' प्रकल्प राबवत आहे. मेट्रो रेल्वे (बांधकाम) कायदा, 1978 अंतर्गत मेट्रो रेल्वे प्रशासनाला मेट्रोच्या संरेखनालगत किंवा त्यावरील होणाऱ्या विकासाचे नियमन करण्याचे अधिकार आहेत.

मुंबई मेट्रो लाइन–3 चे अंदाजे 6.35 मीटर व्यास असलेले दोन (2) बोगदे, अंदाजे 20–22 मीटर अंतरावर व जमिनीपासून 17–25 मीटर खोल असून, मुंबई मेट्रो लाईन–3 संरेखनाच्या (नकाशात दाखवल्याप्रमाणे) दोन्ही बाजूस काही स्थावर मालमत्तेंच्या खाली स्थित आहेत.

वरील नमूद क्षेत्रान्तर्गत कोणत्याही विकास/पुनर्विकासामुळे मेट्रो बोगदे, जमिनीच्या वर व खालील मेट्रो संरचानांवर होणारा कोणताही प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी, मुंबई मेट्रो लाईन–3 संरेखनाच्या ( 100 मीटर प्रभाव क्षेत्राच्या) आत येणारे विकासक (मालमत्ता मालक, जमीनदार, गृहनिर्माण संस्था, असोसिएशन व तत्सम संस्थाने) यांनी कोणताही विकास / पुनर्विकास सुरू करण्यापूर्वी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) कडून मंजुरी घेणे अनिवार्य आहे. तपशीलानुसार, नलिका किंवा विहिरी खोदणे, बांधकाम करने किंवा पाडणे, भू–तांत्रिक तपासणी, उत्खनन, कोणत्याही पायाभूत सुविधांची उभारणी किंवा विकासासाठी 'संचालक' (नियोजन व मालमत्ता विकास / एनएफबीआर), मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन, यांच्याकडे अर्ज करून अनुमति प्राप्त करावी लागेल. याबाबत सर्व प्रकारची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन च्या वेबसाइटवर उपलब्ध केली गेली आहे (लिंक पहा : https://mmrcl.com/en/properties).

मेट्रो संरचनेजवळील बांधकामाधीन भूखंडाच्या बाहेर ये–जा करणाऱ्या पादचारी व प्रवाशांच्या सुरक्षेची खात्री करणे आवश्यक असून दुर्घटना टाळण्यासाठी विशेष सुरक्षेचे प्रयोजन करणे अनिवार्य आहे. विशेषतः, संभाव्य अपघात जसे की बांधकामा दरम्यान मचान/शटर कोसळणे, उपकरणे घसरणे, ढिगाऱ्यांचे तुकडे पडणे, इत्यादी. या अनुषंगाने, बांधकामाची उपकरणे हाताळताना संबंधित जोखीम व धोके कमी करण्यासाठी ऑपरेशनल सुरक्षा मानकांचे (जसे OSHA) पालन करणे, उपकरणांची नियमित तपासणी करून, भार (Permissible Loads) मर्यादांचे काटेकोर पालन करणे, तसेच ऑपरेटरचे प्रशिक्षण सुनिश्चित करणे आवश्यक आहे. सदर अट सर्व विकास/पुनर्विकासांना लागू असून एमएमआरसी ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) प्राप्त झालेल्या विकासांना सुद्धा लागू होईल.

वरील बाबींचे काटेकोर पालन करणे अनिवार्य आहे, अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**–स्वाक्षांकित–**
**श्री. स्वेतल कनवाळू**
**उप महाव्यवस्थापक (नगर नियोजन)**




Size 16 x 11_cm_Marathi